**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**

१२. माझे काहीही शिक्षण झालेले नाही. माझे वडिलांचे गांव हुपरी आहे. माझ्या मोठया भावाचे नांव आप्पासाहेब व त्याच्या बायकोचे नांव सरुबाई असे होते. ते दोघे मयत आहेत. माझ्या दुस-या भावाचे नांव बाळासाहेब आहे. आप्पासाहेब यांना चार मुली व एक मुलगा आहे. बाळासाहेब यांना दोन मुली व एक मुलगा आहे. मला दोन बहिणी आहेत. दावा मिळकत वडिलार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.दा.क्र. ७३/२००८ चा दावा वाटपासाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये माझा, विमल, महादेवी, आप्पासाहेब व बाळासाहेब यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा ठरला होता. हे म्हणणे खरे नाही की, आमचे भावा-बहिणींचे संबंध चांगले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कोर्टाचे निकालाप्रमाणे आमचे हिस्से तुटक करुन घेतले नाही. माझ्या बहिणींनी कोर्टाचे निकालाप्रमाणे त्यांचे हिस्से तुटक करुन घेतले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ५.७.२०१४ पासुन दावा मिळकत आहे तशीच आहे. महादेवी व विमल ह्या माझ्या बहिणींनी त्यांचा हिस्सा तुटक करुन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अर्ज कोर्टात केला नव्हता. मी माझा हिस्सा तुटक करुन मिळणेसाठी इतर हिस्सेदारांना नोटीस दिली होती किंवा कसे हे मला आता आठवत नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या चतुःसिमा मी चुकीच्या नमुद केल्या आहेत. सन २०१६ साली आमचेत वाटण्या झाल्या होत्या. मी सदर वाटणी झालेबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे का ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाटपासाठी प्रकरण जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविणेत आले होते. वाटपाचा निकाल झाला आहे तो या कामी दाखल करणेस मी तयार आहे.

**उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2026.07.14 17:54:33 +0530

दिनांक – १४.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी.